
• वर्ष : ०३ • अंक : २२२ • पुणे • रविवार, दि. ३ मे २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




# माणुसकीचा घात चिमुरडीवर आघात

**भोरच्या नसरापूरात ३ वर्षी चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून हत्या ६५ वर्षीय आरोपीला ५ दिवसांची कोठडी, शेणाच्या ढिगाऱ्याखाली आढळला मृतदेह**

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

## नसरापुरमधील घटनेने पुणे हादरले

## ग्रामस्थांचा पुणे-सातारा मार्गावर ठिय्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

साडेतीन वर्षांच्या मुलीवर ६५ वर्षांच्या सराईताने अत्याचार करून, तिची दगडाने ठेचून हत्या केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. खून करून मृतदेह गोठ्यात लपवण्यात आला होता. ही घटना पुणे-सातारा महामार्गावरील नसरापूर गावच्या हद्दीत शुक्रवारी दुपारी साडेचारच्या दरम्यान घडली. या घटनेनंतर नसरापूर आणि परिसरात संतापाची लाट उसळी असून संपूर्ण जिल्हा हादरून गेला आहे.

याप्रकरणी राजगड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी अवघ्या दीड तासांत आरोपीच्या मुसक्या आवळल्या. भीमराव कांबळे (वय ६५, साळवडे, ता. भोर) असे नराधमाचे नाव आहे. पीडित मुलगी पुण्यातील धायरीची आहे. ती गुरुवारी आजीकडे नसरापूरमध्ये सुट्टीसाठी आली होती. दुपारी ती एकटीच घराबाहेर खेळत होती. उन्हाची वेळ असल्यामुळे रस्त्यावर फारशी वर्दळ नव्हती. हे पाहून आरोपी चिमुकलीशी बोलत तिला एका गुरांच्या गोठ्यात घेऊन गेला. तिच्यावर अत्याचार करून दगडाने ठेचून तिची हत्या केली आणि मृतदेह खड्ड्यात टाकून त्याच्यावर पालापाचोळा टाकला, अशी माहिती समोर आली आहे. मुलगी बराच वेळ दारात दिसत नाही म्हणून शोधाशोध सुरु झाली. परिसरातील सीसीटीव्ही तपासल्यावर आरोपी मुलीसह मंदिराच्या दिशेने गेल्याचे आढळले. या घटनेनंतर गावातील अनेक ठिकाणचे सार्वजनिक सीसीटीव्ही बंद असल्याचे समोर आले. या घटनेनंतर नसरापूर आणि परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नागरिकांनी रात्री साडेनऊ ते साडे अकरा या वेळेत पुणे-सातारा महामार्गावर ठिय्या आंदोलन केले. दरम्यान, पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल घटनास्थळी आले. हा खटला जलदगती आरोपीला जास्तीत जास्त कठोर न्यायालयामध्ये चालवून शिक्षा कशी होईल यासाठी आम्ही प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. त्यानंतर, नागरिकांनी रस्ता रोखा मागे घेतला. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. दरम्यान, आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, आरोपीला आमच्या ताब्यात द्या, आम्ही त्याला ठेचून मारू, असा पवित्रा येथील नसरापुरकरांनी घेतला आहे. नसरापूरमध्ये काल सकाळपासून नागरिकांनी ठिय्या आंदोलन सुरू केले होते. घटनास्थळी आलेल्या अधिकाऱ्यांचे सकारात्मक उत्तर न मिळाल्याने आंदोलक संतप्त झाले. त्यांनी पुणे-सातारा महामार्ग अडवून धरण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी लाठीमार करून जमावाला सेवा रस्त्याच्या बाजूला घेतले. काही पोलिसांनी धक्काबुक्की केल्याचा महिलांनी आरोप केला आहे. सुळे, खासदार सुप्रिया आमदार रोहित पवार, शंकर मांडेकर, माजी आमदार संग्राम थोपटे यांनी नसरापूर येथे चिमुकलीच्या आजी, आजोबांची भेट घेतली. आरोपीला लवकर कठोर शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी धायरी (पुणे) येथे चिमुकलीच्या आई-वडिलांची भेट घेतली. "आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, आरोपीला आमच्या ताब्यात द्या, आम्ही त्याला ठेचून मारू" असा पवित्रा येथील गावकऱ्यांनी घेतला आहे. घटनेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आज सकाळपासून हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असून तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पीडित मृत्युमुखी मुलीचे शवविच्छेदन ससून रुग्णालयात सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. तर नराधम आरोपीने मुलीवर अत्याचार केले असल्याचे शवविच्छेदनंतर स्पष्ट होणार आहे. भोर आणि राजगड तालुक्याला जोडणारी महत्त्वाची बाजारपेठ असणाऱ्या गावात भीमाजी कांबळे (वय ६५) या नराधम आरोपीने एका साडेतीन वर्षाच्या मुलीला गोठ्यातील पत्रा वजा शेडमध्ये नेऊन अत्याचार करून तिचा खून केला. ही घटना शुक्रवारी (दि. १ ) दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास घटना घडली होती. या निषेधार्थ शुक्रवारी रात्री पुणे सातारा महामार्ग ग्रामस्थांनी रास्तारोको आंदोलन केले होते. तर आज शनिवारी (दि.२) नसरापूर बाजारपेठ बंद ठेऊन पदयात्रा काढून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

## चाकणमध्ये अत्याचारानंतर बालकाची हत्या

- **सुटकेसमध्ये आढळला मृतदेह; अल्पवयीन मुलगा ताब्यात**

चाकण, (वार्ताहर) : वर्षांच्या औद्योगिक वसाहती नजीक असणाऱ्या खालुम्ब्रे गावात तीन बालकाची अत्याचारानंतर हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी एका अल्पवयीन मुलास पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत करण्यात आला असल्याची 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. ही घटना शुक्रवारी घडली. तीन वर्षांचा मुलगा खेळत असताना बेपत्ता झाला. त्याचा शोध घेत असताना शेजारीच राहणाऱ्या एका परप्रांतीय अल्पवयीन मुलाच्या बोलण्यातील विसंगतीमुळे पोलिसांना संशय आला. त्याच्या घराची झडती घेत असता खोलीत सुटकेसमध्ये बालकाचा मृतदेह आढळून आला. बालकाच्या गळ्यावर शस्त्राने वार केल्याच्या खुना आढळून आल्या असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी महाळुंगे (इंगळे) पोलिस ठाण्याचे निरीक्षक अनिल देवडे तपास करीत आहेत.

## गुन्हेगारी पार्श्वभूमी

आरोपीवर १९९८ मध्ये विनयभंग, २०१५ मध्ये विनयभंग व पॉक्सो अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. तो २०१९ मध्ये तुरुंगाबाहेर आला होता. मिळेल ती मजुरी करून तो आपली गुजराण करत होता.

## नसरापुरमध्ये घडलेल्या घटनेचे पडसाद राज्यभर

स्थानिक आमदार शंकर मांडेकर यांनी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांना फोन लावून गावकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. दरम्यान मांडेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री सुनेत्रा पवार यांचा देखील फोनवरती संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान गावकऱ्यांनी आक्रोश करत आरोपीला आमच्या ताब्यात द्या किंवा फाशी द्या या दोनच मागण्या केल्या आणि त्या मागणीवरती ठाम राहिले. यादरम्यान आजी-माजी आमदार एकत्र येऊन गावकऱ्यांची त्यांनी समजूत काढली.

## चौकशी कशासाठी?

आरोपी भिमाजी कांबळे याने एका मुलीवर यापूर्वी अत्याचार केले असून त्याच्यावर राजगड पोलीस ठाण्यात दोन गंभीर गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्याची जर आरोपीने कबुली दिली असेल तर चौकशी कशासाठी? असा खडा सवाल तरुणांनी केला आहे.

# कायदे फक्त बाहुले : गरीबांसाठी न्याय कुठे?

**(दै. आरंभ पर्व)**



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे घडलेली साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवरील अत्याचार आणि निर्घृण हत्या ही घटना मन सुन्न करणारी आहे. अशा प्रकारच्या घटनांनी केवळ एक कुटुंब उद्ध्वस्त होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेवर, नैतिकतेवर आणि न्यायव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. या पार्श्वभूमीवर “कायदे फक्त बाहुले” हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे येतो.

आज भारतात महिलांच्या आणि बालकांच्या सुरक्षेसाठी अनेक कडक कायदे अस्तित्वात आहेत. बाल लैंगिक अत्याचारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष कायदे, जलदगती न्यायालये, कठोर शिक्षा हे सर्व कागदोपत्री अत्यंत सक्षम दिसते. पण वास्तवात परिस्थिती वेगळी आहे. गुन्हे होतच राहतात, आरोपी पुन्हा पुन्हा असे कृत्य करतात आणि समाज असहाय्यपणे हे सगळं पाहत राहतो. त्यामुळेच प्रश्न पडतो कायद्यांचा खरा उपयोग होतोय का, की ते फक्त दाखवण्यासाठी उभे केलेले पुतळे आहेत?

नसरापूरच्या घटनेत आरोपीने एका निरागस चिमुकलीला लक्ष्य करून अत्यंत क्रूरपणे तिचा जीव घेतला. या घटनेनंतर गावकऱ्यांमध्ये उसळलेला संताप स्वाभाविक आहे. लोक रस्त्यावर उतरले, आंदोलन केले, आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. काहींनी तर थेट “आरोपीला आमच्या ताब्यात द्या” अशी भूमिका घेतली. ही भूमिका चुकीची असली, तरी ती निर्माण होण्यामागे कारण स्पष्ट आहे. न्यायव्यवस्थेवरील कमी झालेला विश्वास.

प्रत्येक अशा घटनेनंतर आपण एकच पॅटर्न पाहतो. सुरुवातीला मोठा संताप, नंतर राजकीय नेत्यांच्या भेटी, आश्वासने, आणि मग काही दिवसांनी शांतता. पण या शांततेमागे प्रश्न अनुत्तरितच राहतात. खटले वर्षानुवर्षे चालतात, पुरावे कमकुवत होतात, साक्षीदार फिरतात आणि अनेकदा आरोपी शिक्षा टाळतात. अशा परिस्थितीत गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती राहणार कशी?

पोलिस यंत्रणा अनेकदा तात्काळ कारवाई करून आरोपीला अटक करते, हे नक्कीच कौतुकास्पद आहे. पण अटक ही केवळ सुरुवात आहे. खरी कसोटी असते ती न्यायालयीन प्रक्रियेची. जर ती प्रक्रिया संथ, गुंतागुंतीची आणि दीर्घकालीन असेल, तर न्याय उशिरा मिळतो आणि “उशिरा मिळालेला न्याय म्हणजे न्याय नाकारल्यासारखाच” ही म्हण पुन्हा खरी ठरते. कायद्यांची अंमलबजावणी ही केवळ शिक्षा देण्यापुरती मर्यादित नसून, गुन्हे रोखण्याचीही जबाबदारी आहे. पण आज परिस्थिती अशी आहे की, गुन्हेगारांना शिक्षा होण्याची भीती कमी आणि सुटून जाण्याची शक्यता जास्त वाटते. त्यामुळेच अशा प्रकारचे गुन्हे पुन्हा पुन्हा घडताना दिसतात.

यामध्ये केवळ न्यायव्यवस्था दोषी नाही. समाजाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. अनेकदा आपल्या आसपास घडणाऱ्या संशयास्पद हालचालींकडे आपण दुर्लक्ष करतो. मुलांच्या सुरक्षिततेबाबत आवश्यक ती खबरदारी घेतली जात नाही. सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा असली, तरी ती कार्यरत नसते. या सर्व बाबी एकत्रितपणे अशा घटनांना खतपाणी घालतात.

सरकारने आणि प्रशासनाने या घटनांकडे केवळ कायदेशीर दृष्टिकोनातून न पाहता, व्यापक सामाजिक समस्येच्या रूपात पाहणे आवश्यक आहे. यासाठी काही ठोस उपाययोजना गरजेच्या आहेत.

बालकांवरील अत्याचारांच्या प्रकरणांसाठी खटले ठरावीक कालमर्यादेत पूर्ण करण्याची सक्ती

- फास्ट ट्रॅक न्यायालयांची संख्या आणि कार्यक्षमता वाढवणे
- तपास प्रक्रियेत तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर
- साक्षीदार संरक्षण यंत्रणा मजबूत करणे
- सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करणे

यासोबतच समाजात जागरूकता निर्माण करणेही तितकेच गरजेचे आहे. पालकांनी मुलांच्या सुरक्षिततेबाबत अधिक सतर्क राहणे, शाळा आणि स्थानिक प्रशासनाने सुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे राबवणे, आणि नागरिकांनीही जबाबदारीने वागणे आवश्यक आहे.

नसरापूरमधील ही घटना केवळ एका गावापुरती मर्यादित नाही. ती संपूर्ण समाजासाठी एक इशारा आहे. जर आपण आजही यापासून धडा घेतला नाही, तर उद्या अशा घटना पुन्हा घडतील आणि आपण पुन्हा त्याच पद्धतीने संताप व्यक्त करत राहू.

“कायदे फक्त बाहुले” ही भावना बदलायची असेल, तर कायद्यांना केवळ कागदावर न ठेवता, प्रत्यक्षात प्रभावीपणे अंमलात आणणे गरजेचे आहे. न्यायप्रक्रियेला गती, पारदर्शकता आणि कठोरता देणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, समाजाचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास आणखी ढासळेल आणि तो ढासळला, तर लोकशाहीची पायाभरणीच कमकुवत होईल.



## थोडक्यात पण महत्वाचे



### उत्कृष्ट कामगिरीबद्दल दिपाली चासकर (कहडणे) यांचा सन्मान

जुन्नर (आरंभ पर्व) : पुणे ग्रामीण पोलीस दलातील सहायक पोलीस उपनिरीक्षक दिपाली चासकर (कहडणे) यांना पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरी बद्दल आज शुक्रवारी दि. १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. सहायक पोलीस उपनिरीक्षक दिपाली चासकर (कहडणे) यांनी जिल्हा विशेष शाखा, गुन्हे अन्वेषण शाखा, सीआयडी पुणे तसेच जिल्हा वाहतूक शाखेत उल्लेखनीय कार्य केले आहे. विविध गुन्हे अहवाल, अधिवेशन माहिती आणि सादरीकरणांमध्ये त्यांनी अचूक व परिणामकारक कामगिरी बजावत आजपर्यंत सुमारे ११२ बक्षिसे प्राप्त केली आहेत. राज्यातील पोलीस दलात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या सुमारे ८०० अधिकारी व कर्मचाऱ्याना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर केले होते. यात पुणे ग्रामीण पोलीस दलातील सात जणांचा समावेश आहे. राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. पुणे ग्रामीण पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक विनोद भोकरे, महेश बनकर, सुहास पवार, राजेंद्र कोकेरी तसेच सहायक पोलीस उपनिरीक्षक प्रदीप भावसार, दिपाली चासकर (कहडणे) आणि राहुल पवार यांना सन्मानीत करण्यात आले.



### धायरी येथे आजी माजी कामगारांचा सन्मान सोहळा संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : आज दिनांक 1 मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त ज्ञानदीप फाउंडेशन धायरी यांच्यामार्फत ग्रामपंचायत कार्यालय येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सुरुवातीला ध्वजारोहण करून राष्ट्रगीत, महाराष्ट् गीत घेण्यात आले त्यानंतर विविध क्षेत्रातील कामगारांचा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला यामध्ये मनपा पुणे ,तळेगाव डेपो, एसटी डेपो,सी डब्ल्यू पी आर एस, खडकी डेपो , व महावितरण येथील कामगारांचा सन्मान करण्यात आला कार्यक्रमाचे संयोजन ज्ञानदीप फाउंडेशनचे अध्यक्ष श्री नामदेवराव भुरूक यांनी केले यावेळी सिद्धी पोकळे हिचा एमबीबीएस झाल्याबद्दल सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यावेळी नगरसेवक काकासाहेब चव्हाण ,गुलाब पोकळे सामाजिक कार्यकर्ते श्री रामदास कुंभार, दिलीप रायकर,तानाजी कांबळे, दिनेश कुंभार, अ‍ॅड राजेंद्र मिन्डे अ‍ॅड राजेंद्र भुरूक,किशोर पोकळे, याचबरोबर प्रमोद रायकर, तुषार पोकळे, वस्ताद सुभाष पोकळे ,रमेश चांदेकर आदी मान्यवर उपस्थित होते ग्रामस्थ व नागरिक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### एमओए दिनानिमित्त आठवडाभर जनजागृती उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र अस्थिरोग संघटना (एमओए) तर्फे 'एमओए दिन' निमित्त १ मे ते ७ मे २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हाडे, सांधे आणि मणक्यांच्या आरोग्याबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. यंदाची संकल्पना "आपले गुडघे वाचवा, आपले मणके वाचवा, आपले हाडे वाचवा" अशी ठेवण्यात आली आहे. या उपक्रमांचा शुभारंभ पुण्यातील संचेती रुग्णालय येथे मान्यवर अस्थिरोग तज्ज्ञ आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी डॉ. पराग संचेती, डॉ. एन. जे. कर्णे, डॉ. प्रशांत टोनपे, डॉ. सचिन आबणे, डॉ. मुकेश धर्मा, डॉ. मनीष कुलकर्णी, डॉ. अतुल पाटील तसेच डॉ. शैलेश हडगांवकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. कर्णे यांनी संघटनेच्या स्थापना दिनाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, २०१८ पासून १ मे हा दिवस 'एमओए दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने दरवर्षी १ ते ७ मे या कालावधीत राज्यभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातात. या उपक्रमांद्वारे हाडांचे आरोग्य, सांध्यांचे विकार, मणक्यांचे आजार, हाडांची ठिसूळता, गुडघेदुखी व पाठदुखी यांचा प्रतिबंध तसेच निरोगी जीवनशैली याबाबत जनजागृती केली जात आहे. या आठवड्यात राज्यातील विविध ठिकाणी जनजागृती व्याख्याने, मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरे, हाडांची घनता तपासणी, सार्वजनिक संवाद कार्यक्रम आणि शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. दरम्यान, संचेती रुग्णालय येथे आयोजित मोफत तपासणी शिबिरात ५०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदविला.

### पतीच्या जाचाला कंटाळून विवाहितेची लहान मुलीसह आत्महत्या

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : मुलगा होत नसल्याच्या कारणावरून पतीची वेळोवेळी होणारी मारहाण तसेच सततच्या जाचाला कंटाळून एका विवाहितेने तिच्या लहान मुलीसह विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना येथे घडली. संजीवनी लक्ष्मण कुमटकर (वय ३५ रा. राजगुरूनगर ) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याबाबत पती लक्ष्मण अश्रुबा कुमटकर (सध्या रा. राजगुरूनगर, ता. खेड, मुळ रा. राजेवाडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) याच्यावर खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत विवाहितेला दोन मुली होत्या. मुलगा होत नाही या कारणावरून पती लक्ष्मण कुमटकर याने वेळीवेळी शिवीगाळ व दमदाटी करून तसेच मारहाण करून विवाहितेचे जिवन जगणे मुश्किल केले होते

# महालक्ष्मी सरस मधून १ कोटी लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट!

## महिलांसाठी प्रत्येक जिल्ह्यात उमेद मॉल सुरू करणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

प्रत्येक जिल्ह्यातील महिलेला हक्काच व्यासपीठ देणारे महालक्ष्मी सरस प्रदर्शन आता नव्या रूपात तयार झालं असून, कोणत्याही जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाची स्पर्धा करण्यासाठी ते सज्ज आहे. या प्रदर्शनात केवळ सजावटीसाठी कंटेनर लावलेले नाहीत तर ते कंटेनर ऑफ इंडिया आहेत, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात आत्तापर्यंत ५० लाख लखपती दीदी तयार झाल्या आहेत, येणाऱ्या काळात १ कोटी लखपती दीदी तयार करण्याचं उद्दिष्ट आहे, असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे झालेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२६ सोहळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते पार पडले. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत व ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मुख्य सचिव एकनाथ डवले (IAS), मुख्य कार्यकारी




अधिकारी उमेद निलेश सागर (IAS), मुख्य परिचालन अधिकारी निखिल ओस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचं असेल तर, आपल्या देशातील नारीशक्तीच्या शक्तीचा उपयोग देशाच्या विकासाच्या वाटचालीमध्ये करावा लागेल. ज्या क्षणी ही नारीशक्ती मानव संसाधन म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभागी होईल त्या क्षणी भारत विकसित होईल. म्हणूनच मोदीजींनी नारीशक्ती सक्षमीकरणाच्या अनेक योजना या ठिकाणी सुरू केल्या. मला आनंद आहे गेला दहा वर्षात महाराष्ट्रामध्ये उमेद, मवीमच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महिला बचत गटांची चळवळ उभी राहिली. आणि लाखो महिला या चळवळीशी जोडल्या गेल्या. अनेक कुटुंब लाभार्थी झाली. अनेक महिलांनी स्वतःच्या बळावर बचत गटासोबत आपलं कुटुंब ही सक्षम करण्याचं काम केलं. जे मोदीजींना अपेक्षित होतं ते आमच्या महिलांनी करून दाखवलं असंही मुख्यमंत्री म्हणाले.

आतापर्यंत ५० लाख महिला लखपती दीदी झाल्या आहेत. लवकरच पुढच्या काही वर्षात ही संख्या एक कोटीच्या आकडा पार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरायला हवे त्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. महाराष्ट्रामध्ये ३०० कोटी झाडे लावण्याची एक मोहीम हातामध्ये घेतली. उमेदच्या माध्यमातून एक योजना तयार करून, त्या योजनेमध्ये बचत गटांना नर्सरी तयार करण्याकरता आपण निधी उपलब्ध करून देऊ, नर्सरी तयार करण्याचे काम महिला करतील आणि त्यासोबत दरवर्षी झाड लावणं आणि त्या झाडांची निगा ठेवून याकरताही जे काही आवश्यक त्याचा खर्च आहे तो खर्चही आपण उपलब्ध करून देऊ. त्यामुळे या महिलांना काम आणि उत्पन्न दोन्ही मिळेल त्यासाठी आराखडा तयार करण्याचा सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी केल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या भाषणानंतर उपस्थित महिलांना संबोधित करताना मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, महालक्ष्मी सरस २०२६ मुळे आमच्या हक्काच्या महिलांना आज रोजगार मिळत आहे. महाराष्ट्रातील इतिहासात पहिल्यांदा इतक्या भव्य स्वरूपात असले महालक्ष्मी सरस प्रदर्शन होत आहे. लाडक्या बहिणींना बळ देण्याचे काम आणि त्यांना स्वतःचा पायावर उभे राहतील या उद्देष्टाने पुढे जात आहोत. देशात ५० टक्के महिला आहेत. आज महिला सगळ्या क्षेत्रात पुढे जात आहेत. उमेदच्या माध्यमातून ६४ लाख कुटुंब यामध्ये सहभागी झाली आहेत. ३४ हजार महिला बचत गट आहेत.

५० हजार कोटी रुपये कर्ज बचत गटाला दिले गेले. आणि हे सर्व कर्ज महिलांनी एक रुपया देखील न थकवता परत केल्याचे म्हणत मंत्री गोरे यांनी महिलांचे कौतुक केले.

### एक कोटी लखपती दीदींसाठी दिवस-रात्र प्रयत्न करणार

मंत्री गोरे पुढे म्हणाले की, मोदींनी लखपती दीदी संकल्प सुरू केली. त्यानंतर आता ३ कोटी महिलांना लखपती करण्याचा संकल्प घेतला आहे. १ कोटी महिला लखपती झाले पाहिजे ही जबाबदारी आमच्या विभागावर दिली आहे. यासाठी आम्ही दिवस रात्र करू पण आपले स्वप्न पूर्ण करून दाखवू. महालक्ष्मी मिनी सरस होतो तेव्हा १००/१५० स्टॉल होते. मात्र, आता १३ जिल्ह्यात फूड मॉल उभारणार आहोत. आमच्या महिला बाजारपेठा सोबत स्पर्धा घेण्यासाठी तयार आहेत. आम्ही महिलांच्या पाठीशी असेच उभे राहू."असे आश्वासन मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहे.

### महिला बचत गटांसाठी उमेदचे मॉल

ग्रामीण भागातील महिलांना हक्काची कायस्वरूपी बाजारपेठ निर्माण करण्यासाठी २० जिल्ह्यांमध्ये उमेदचे मॉल उभारण्याचे काम आपण सुरू केले असून उरलेल्या १६ जिल्ह्यांमध्ये देखील लवकरच मॉल पुढच्या पाच ते दहा वर्षांमध्ये प्रत्येक तालुक्यात उभारले जाणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली आहे.

## महाराष्ट्र दिनानिमित्त eSVee Academy चा माणुसकीला सलाम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र दिन म्हणजे केवळ अभिमानाचा दिवस नाही, तर समाजाप्रती आपली जबाबदारी जपण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. हाच सामाजिक संदेश जपत eSVee Academy ने महाराष्ट्र दिनानिमित्त मातोश्री वृद्धाश्रम तसेच मतिमंद विद्यालयामध्ये एक अत्यंत प्रेरणादायी आणि हृदयस्पर्शी सेवा उपक्रम राबवला. या उपक्रमांतर्गत वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना तसेच मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना पूर्णतः मोफत हेअरकट, ग्रूमिंग आणि निगा सेवा प्रेमाने देण्यात आल्या. या सेवेमागे केवळ सौंदर्य नव्हतं, तर त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याचा,



आत्मविश्वास वाढवण्याचा आणि आत्मसन्मान जपण्याचा सुंदर प्रयत्न होता. वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या डोळ्यांत दिसलेला आनंद आणि मतिमंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेलं निरागस हास्य, हा संपूर्ण उपक्रमाचा सर्वात भावनिक आणि प्रेरणादायी क्षण ठरला.

## लोकप्रिय मागणीनुसार iQOO Neo १० नव्या रंगांत; ५ मेपासून विक्री

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

iQOO कंपनीने आपल्या लोकप्रिय iQOO Neo 10 स्मार्टफोनचे अल्पाइन व्हाइट आणि अस्फाल्ट ब्लॅक हे दोन नवीन रंग पर्याय बाजारात सादर केले आहेत. ग्राहकांच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर सादर करण्यात आलेले हे व्हेरिएंट्स आकर्षक डिझाइन आणि प्रीमियम लूकमुळे लक्ष वेधून घेत आहेत. हाय-परफॉर्मन्स रेसिंग कार्सपासून प्रेरित या रंगांमध्ये वेग आणि स्टाईलचा समतोल साधण्यात आला आहे. अल्पाइन व्हाइट हा रंग कूल-टोन फिनिशमुळे उठून दिसतो, तर अस्फाल्ट ब्लॅक हा रंग दमदार आणि स्टायलिश लूक पसंत करणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरतो. या स्मार्टफोनची किंमत 8GB+256GB व्हेरिएंटसाठी ₹37,999 (प्रभावी ₹34,999) आणि




12GB+256GB व्हेरिएंटसाठी ₹42,999 (प्रभावी ₹40,999) इतकी ठेवण्यात आली आहे. विक्री 5 मे रोजी दुपारी 12 वाजल्यापासून iQOO च्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच Amazon वर सुरू होणार आहे. iQOO Neo 10 मध्ये Snapdragon 8s Gen 4 प्रोसेसरसह Q1 सुपरकंप्यूटिंग चिप देण्यात आली असून, यामुळे 144 FPS पर्यंत स्मूथ गेमिंग अनुभव मिळतो. 2.5 दशलक्षांहून अधिक अँटूटू स्कोअरमुळे हा फोन आपल्या श्रेणीत वेगवान मानला जात आहे. 7000 mm² व्हेपर चेंबरसह प्रगत कूलिंग सिस्टीममुळे दीर्घकाळ वापरातही कार्यक्षमता टिकून राहते. फोनमध्ये 6.78 इंचाची 1.5K AMOLED डिस्प्ले, 144Hz रिफ्रेश रेट आणि 5500 निट्स पीक ब्राइटनेस देण्यात आला आहे. याशिवाय, मिलिटरी-ग्रेड ड्रॉप रेझिस्टन्समुळे टिकाऊपणातही भर पडली आहे. फोटोग्राफीसाठी 50 मेगापिक्सल Sony OIS प्रायमरी कॅमेरा, अल्ट्रा-वाइड लेन्स आणि 32 मेगापिक्सल फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. 4K 60fps व्हिडिओ रेकॉर्डिंगसह सुपर नाईट मोड आणि पोर्ट्रेट मोड यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. हा स्मार्टफोन Android 16 आधारित Origin OS 6 वर चालतो. 'मेक-इन-इंडिया' उपक्रमांतर्गत याचे उत्पादन ग्रेटर नोएडा येथील Vivo प्लांटमध्ये करण्यात येत असून, देशभरातील 700 हून अधिक सेवा केंद्रांद्वारे ग्राहकांना विक्रीनंतरची सेवा उपलब्ध होणार आहे.

## 'महाराजस्व समाधान शिबिराला' उत्स्फूर्त प्रतिसाद

- हजाराहून अधिक नागरिकांचा लाभ

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत श्रीक्षेत्र थेऊर मंडल भागात आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'महाराजस्व समाधान शिबिराला' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. थेऊरफाटा-थेऊर मार्गावरील आशीर्वाद सभागृहात पार पडलेल्या या शिबिरात हजाराहून अधिक नागरिकांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला. या शिबिराचे आयोजन पंचायत समिती हवेलीचे सभापती युवराज काकडे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. विविध शासकीय विभागांना एकत्र आणून नागरिकांच्या समस्या एकाच ठिकाणी जलदगतीने सोडविण्याचा प्रयत्न यशस्वी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांचे शासकीय अडथळे दूर करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरल्याचेही सांगण्यात



आले. तहसीलदार तृप्ती कोलते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. थेऊर, कोलवडी, साष्टे, कुंजीरवाडी आणि मांजरी बुद्रुक येथील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शिबिरात महसूल, पोलीस, कृषी, आरोग्य, भूमी अभिलेख, पाटबंधारे, वीज वितरण, सार्वजनिक बांधकाम, समाजकल्याण, वन आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, निवासी दाखले, सातबारा उतारे, फेरफार, वारस नोंद, मोजणी, तुकडेबंदी नियमितीकरण, पीकविमा, विविध शासकीय अनुदान योजना तसेच ग्रामपंचायत करसंबंधित प्रश्नांवर मोठ्या प्रमाणात अर्ज स्वीकृत करण्यात आले. अनेक प्रकरणांचा जागीच निपटारा करण्यात आला, तर काही लाभार्थ्यांना प्रतीकात्मक स्वरूपात दाखल्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत, अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते, अतिरिक्त गटविकास अधिकारी शिवाजी नागवे, पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, वाहतूक पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट, जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती जितेंद्र बडेकर, जिल्हा परिषद सदस्या शितल कांबळे, सुरेखा हरगुडे तसेच विविध लोकप्रतिनिधी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभियानामुळे शासनाच्या सेवा नागरिकांपर्यंत जलदगतीने पोहोचत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. भविष्यातही अशा शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



## भरत गीते यांना 'हाऊस ऑफ कॉमन्स', 'ग्लोबल इन्स्पिरेशन ऑफ द इयर २०२६' पुरस्कार

**लंडन (दै. आरंभ पर्व)**

मराठी उद्योजक व तौरल इंडियाचे संस्थापक भरत गीते यांना ब्रिटिश पार्लमेंटमधील प्रतिष्ठित 'ग्लोबल इन्स्पिरेशन ऑफ द इयर २०२६' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच गीते यांना 'हाऊस ऑफ कॉमन्स' या विशेष सन्मानानेही गौरविण्यात आले. 'अ‍ॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गीते यांच्या कार्याचा जागतिक स्तरावर झालेला हा गौरव भारताच्या उद्योगविश्वासाठी आणि महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरला आहे. लंडन येथील ब्रिटिश संसदेच्या पोर्टक्युलिस हाऊसमधील बुथरॉईड कक्षात हा सोहळा नुकताच पार पडला. दक्षिण आशियाई वाणिज्य व उद्योग मंडळाच्या वतीने गुजरात आणि महाराष्ट्र स्थापना दिनानिमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उद्योगपती अलोक किर्लोस्कर यांनाही याच पुरस्काराने गौरविण्यात आले. दोन्ही उद्योजकांच्या कार्यामुळे या सन्मानाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. या कार्यक्रमास ब्रिटनचे खासदार लुईस फ्रेंच, मराठी मंडळ लंडनचे सुशील गायकवाड, लॉर्ड रामिंडेर रेंजर, ओशियन अँड नॅचरल रिसोर्सेस संचालनालयाचे वरिष्ठ वाणिज्य संचालक सुरेश यादव, साऊथ एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे चेअरमन महेंद्रसिंह जडेजा आदी उपस्थित होते.

# पोलीस स्टेशन समोरच सतरा गाड्या थार जीपने उडवल्या

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सकाळी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात झेंडा वंदन झाल्यानंतर थोडयाच वेळात पोलिसांनी विविध गुन्हयात जप्त केलेल्या दुचाकीमध्ये थार जीप घुसून १७ दुचाकींचे नुकसान केल्याची घटना लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या समोर घडली आहे .अल्पवयीन मुलाने भरधाव वेगात 'थार' गाडी चालवत नियंत्रण गमावल्याने पोलीस ठाण्यासमोर हा अपघात झाला .त्या मध्ये दुचाकींचे मोठे नुकसान झाले आहे .सुदैवाने या दैव बलवत्तर म्हणून काही पोलीस व एक तरुणी काही इंचाच्या फरकाने






वाचले.याबाबत वाहन मालक नवनाथ पंडित सातव (रा. तांबेवस्ती, केसनंद, ता. हवेली, जि. पुणे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार संतोष तांदळे यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १ मे रोजी पहाटे नवनाथ सातव यांच्या मालकीची महिंद्रा कंपनीची 'थार' (एमएच १२ व्हीव्ही ४१४१) ही गाडी त्यांच्या नात्यातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला देण्यात आली होती. तो आपल्या तीन मित्रांसह तीर्थक्षेत्र रामदरा येथे दर्शनासाठी गेला होता. दर्शन करून परतत असताना सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास लोणी काळभोर गावातील दत्त मंदिर ते लोणी फाटा दरम्यान, पोलीस ठाण्यासमोर येताच चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले.

भरधाव वेग आणि बेदरकार वाहन चालवल्यामुळे थार थेट रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाकींवर आदळली. या धडकेत शासकीय व खाजगी मिळून एकूण १७ दुचाकींचे मोठे नुकसान झाले. विशेष म्हणजे, चालक अल्पवयीन असून त्याच्याकडे वैध परवाना नसतानाही वाहन देण्यात आल्याने वाहन मालकावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून निष्काळजीपणाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक अल्पवयीन तरुण दुचाकी व चार चाकी चालवत आसताना चारचाकी गाडयांना काळया फिल्मींग लावल्यामुळे गाडी चालवणारा दिसत नाही .त्यामुळे अल्पवयीन मुले गाडी चालवत असताना आतील काही दिसत नाही त्यामुळे पोलिसांनी काळया फिल्मींग काढाव्यात अशी मागणी नागरिकांना केली आहे .शेतकरी गाडयांवर कारवाई पण श्रीमंताच्या गाडयांना सुट अशी पोलिसांनी पाँलिशी असल्याचे दिसून येत आहे .त्यामुळे कशाचीही पर्वा न करता काळया फिल्मींग काढा .अशी चर्चा नागरिकां मध्ये सुरू आहे .









# ‘सूर्यदत्त’ विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कटिबद्ध

## प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त संस्थेला 'आयएमसी रामकृष्ण बजाज राष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कार' प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या संचालित सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशन (एसआयएमएमसी) संस्थेला शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी 'आयएमसी रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी अवॉर्डने (आरबीएनक्यूए) सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता, सातत्यपूर्ण सुधारणा आणि उत्कृष्ट व्यवस्थापन पद्धतींचा गौरव म्हणून 'सूर्यदत्त'ला ‘कमेंडेशन सर्टिफिकेट’ प्रदान करण्यात आले. मुंबईतील चर्चगेट येथील आयएमसी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीमध्ये या सोहळ्याचे नुकतेच आयोजन केले होते. नोबेल पारितोषिक विजेते डॉ. कैलास सत्यार्थी, जिंदल स्टेनलेस स्टील, हिसार आणि जीएमआर वरोरा इंजिनिअरिंग लिमिटेड यांचाही या



सोहळ्यात गौरव करण्यात आला.

भारताचे माजी क्रिकेटपटू, लिटलमास्टर सुनील गावस्कर यांच्या हस्ते 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा व विभागप्रमुख प्रा. डॉ. मनीषा कुंभार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. 'आयएमसी'च्या अध्यक्षा सुनीता रामनाथकर, आरबीएनक्यूए ट्रस्टचे अध्यक्ष निरज बजाज, या समारंभास डॉ. मेधा देशमुख, डॉ. विवेक स्वामी, डॉ. शीतल भुसारे आणि प्रा. स्मिता चव्हाण यांच्यासह सूर्यदत्ता संस्थेचे अनेक प्राध्यापक उपस्थित होते. राष्ट्रीय स्तरावरील या सन्मानामुळे सूर्यदत्त संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण क्षेत्रातील वाटचालीला नवे बळ मिळाले आहे. सुनील गावस्कर

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशनला अलीकडेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे. 'एसआयएमसीसी'ला 'एआयसीटीई-सीआयआय इंडस्ट्री-लिंक्ड टेक्निकल इन्स्टिट्यूट्स सर्वेक्षणात सलग सहा वर्षे प्लॅटिनम कॅटेगरीमध्ये स्थान मिळाले आहे. 'नॅक'कडून 'ए' श्रेणी प्राप्त असलेल्या या संस्थेने शैक्षणिक, संशोधन, उद्योग सहभाग आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे, असेही प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी नमूद केले.

म्हणाले, "शिस्त, संघभावना आणि सातत्य हे आपल्या जीवनात अतिशय महत्वाचे असते. क्रीडा आणि संस्थात्मक यशात साम्य असून, शिक्षण संस्थांनी गुणवत्ता साध्य करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असते. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच या गुणांची गोडी लावली, तर जीवनात यशाकडे वाटचाल करणे सोयीचे होते. शिक्षणासह खेळांमध्येही मुलांनी पारंगत व्हावे. खेळामुळे आपले मानसिक, शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते." कैलास सत्यार्थी यांनी आपल्या भाषणात गुणवत्ता ही केवळ प्रक्रियांपुरती मर्यादित नसून त्यात मूल्ये, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांचाही समावेश असावा, असे सांगितले. तसेच, शिक्षणसंस्थांनी जागतिक पातळीवर जबाबदार नागरिक घडविण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले. सूर्यदत्त समूहाच्या वतीने सुनील गावसकर आणि कैलाश सत्यार्थी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, त्यांना सूर्यदत्त कॅम्पसला भेट देण्याचे निमंत्रण देण्यात आले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी हा प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करीत संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सूर्यदत्त शिक्षण संस्थेने नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिला आहे. जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'सूर्यदत्त' संस्था सातत्यपूर्ण उपक्रम राबवित आहे. हा सन्मान संस्थेच्या शैक्षणिक उत्कृष्टता, नवोपक्रम आणि जागतिक दर्जाकडे होणाऱ्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे, असे त्यांनी सांगितले.




## थोडक्यात पण महत्वाचे



### करसल्लागारांनी मूल्यवर्धित सेवा व धोरणात्मक समुपदेशनावर भर द्यावा

- 'जीएसटी'चे माजी अतिरिक्त आयुक्त धनंजय आखाडे यांचे प्रतिपादन
- 'एमटीपीए'चा ४६ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

पुणे (आरंभ पर्व) : “ऑटोमेशनच्या युगात करसल्लागारांची भूमिका केवळ रिटर्न फायलिंगपुरती मर्यादित राहिलेली नाही. आधुनिक काळात करसल्लागारांनी धोरणात्मक समुपदेशन आणि मूल्यवर्धित सेवा याकडे वाटचाल करणे अत्यावश्यक आहे,” असे प्रतिपादन राज्य वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभागाचे माजी अतिरिक्त आयुक्त धनंजय आखाडे यांनी केले. महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (एमटीपीए) च्या ४६ व्या वर्धापनदिन सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. शिवाजी रस्त्यावरील एमटीपीए सभागृहात आयोजित या कार्यक्रमास वर्धापनदिन सोहळा समितीचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र सोनावणे, एमटीपीएचे अध्यक्ष ॲड. अनुरुद्र चव्हाण, जीएसटी प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे प्रमुख ॲड. पार्थ बधेका, तसेच ज्येष्ठ कर सल्लागार ॲड. अशोक संघवी यांची प्रमुख उपस्थिती होती.

### सत्ताधाऱ्यांविरोधात एकजुटीने व सातत्यपूर्ण संघर्ष करण्याची गरज

पुणे (आरंभ पर्व) : हुकुमशाही वृत्तीच्या सत्ताधाऱ्यांच्या विरोधात एकजुटीने तीव्र आणि सातत्यपूर्ण संघर्ष करण्याचा निर्धार आणि जनतेसमोर सतत आपली भूमिका मांडत राहण्याची गरज आहे, अशी भूमिका विचारवंतांनी मांडली. लोकशाहीची पुनर्स्थापना, संविधानाचे पावित्र्य आणि तळागाळातील जनतेपर्यंत नव्याने नाते जोडण्याचा संकल्प युवक काँग्रेसने हाती घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित 'लोकशाही संवाद' कार्यक्रमांतर्गत अंधश्रद्धा निर्मूलनासाठी झटणारे डॉ. नरेंद्र दाभोलकर, ज्येष्ठ विचारवंत कॉ. गोविंद पानसरे, ज्येष्ठ साहित्यिक एम. एम. कलबुर्गी, पत्रकार गौरी लंकेश व रोहित वेमुला यांच्या नावाने वैचारिक अभियानाचे उद्‌घाटन झाले. याप्रसंगी भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी मनीष शर्मा, ज्येष्ठ विचारवंत विश्वंभर चौधरी, विधिज्ञ ॲड. असीम सरोदे, सामाजिक कार्यकर्त्या स्मिता पानसरे व हमीद दाभोलकर यांनी विचार मांडले. लोकशाही संकल्पवृक्षाला पंचनद्यांचे संकल्पजल अर्पण करून अभियानांची सुरुवात झाली.

# बसच्या धडकेत पादचारी कामगाराचा मृत्यू

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील जुन्या पुणे - नाशिक महामार्गावरील जुना मोटार स्टॅन्ड चौकाजवळ धनश्री हॉटेल समोर वाडा रस्त्याकडे वळणाऱ्या खासगी प्रवासी बसचा धक्का लागल्याने चाकाखाली सापडून रस्त्याने पायी जाणारा कामगार ठार झाल्याची घटना घडली. गंगाराम अण्णा शिंदे (वय ४५, रा. दोंदे, ता. खेड, मूळ गाव काष्टी पिंपळगाव, ता. आंबड, जि. जालना) असे मृत कामगाराचे नाव आहे. खाजगी बसचा (क्र. एम. एच. ४३, एच- ४२३८) शिंदे यांना मागुन धक्का बसला. त्या धक्क्याने ते बस समोरच रस्त्यावर पडले. त्याक्षणी बसचे डाव्या बाजूचे पुढचे चाक त्यांच्या डोक्यावरून गेले. त्यामुळे ते जागीच ठार झाले. या घटनेनंतर बसचालक बस तिथेच सोडून पळून गेला. मृताची पत्नी मागे काही अंतरावर चालत होती. त्यांच्या पत्नीला अपघातात पती गेलेले पाहताच मोठा धक्का बसला.

# फोर्स मोटर्सची विक्रमी झेप; आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सर्वोच्च महसूल व नफा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

Force Motors या अग्रगण्य वाहन निर्मिती कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आतापर्यंतचा सर्वोच्च महसूल आणि नफ्याची नोंद केली आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि संपूर्ण वर्षाचे आर्थिक निकाल जाहीर करताना कंपनीने सातत्यपूर्ण कामगिरी, खर्च नियंत्रण आणि सर्व उत्पादन विभागांतील वाढ यामुळे ही ऐतिहासिक कामगिरी साध्य झाल्याचे स्पष्ट केले.

कंपनीने वर्षभरातील प्रत्येक तिमाहीत स्थिर प्रगती नोंदवली असून, व्यवसायातील शिस्तबद्धता आणि नियोजनबद्ध विस्तार यामुळे एकूण आर्थिक स्थितीत भक्कम सुधारणा झाली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ हे कंपनीच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरले असल्याचेही नमूद करण्यात आले.


देशांतर्गत बाजारपेठेत कंपनीने उल्लेखनीय कामगिरी करत मागील वर्षाच्या तुलनेत एकूण घाऊक विक्रीत सुमारे २० टक्के वाढ नोंदवली. व्हॅन विभागात कंपनीने आपले वर्चस्व कायम राखत सुमारे ७० टक्क्यांहून अधिक हिस्सा टिकवून ठेवला आहे. प्रीमियम प्रवासी वाहतूक विभागात ‘अर्बेनिया’ या मॉडेलने शंभर टक्क्यांपेक्षा जास्त वाढ नोंदवून महत्त्वाची झेप घेतली आहे.

> याबाबत प्रतिक्रिया देताना कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक Prasan Firodia म्हणाले, “स्थापनेपासूनच आम्ही नव्या विभागांची निर्मिती करण्यावर भर दिला आहे. ‘अर्बेनिया’मुळे प्रीमियम प्रवासी वाहतूक क्षेत्रात आम्ही आघाडी घेतली आहे, तर ‘ट्रॅव्हलर’ आणि ‘ट्रॅक्स’सारखी वाहने बाजारपेठेतील विस्ताराला गती देत आहेत. तसेच संरक्षण आणि संस्थात्मक क्षेत्रातील सहकार्यामुळे आमची अभियांत्रिकी क्षमता अधोरेखित झाली आहे.”

ग्रामीण आणि अर्धशहरी भागात कंपनीने आपला विस्तार अधिक बळकट केला असून ‘ट्रॅक्स’ या वाहनाला मिळालेल्या प्रतिसादामुळे या विभागात ७० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. तसेच संस्थात्मक व संरक्षण क्षेत्रातही कंपनीने आपली उपस्थिती मजबूत करत सशस्त्र दलांसाठी विशेष वाहनांच्या महत्त्वपूर्ण मागण्यांची पूर्तता केली आहे.

कंपनीने कर्जमुक्त स्थिती कायम राखली असून, आर्थिक शिस्त आणि

# बंधन इनोव्हेशन फंडाची दोन वर्षे पूर्ण; नाविन्याधारित गुंतवणुकीवर भर कायम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

Bandhan Innovation Fund या गुंतवणूक योजनेने नाविन्याधारित वाढीवर लक्ष केंद्रित करत दोन वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे. देशाच्या भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि नाविन्यतेच्या बळावर प्रगती करणाऱ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्यावर या योजनेचा भर आहे. विशिष्ट उद्दिष्टाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेत संशोधन व विकासावर मोठा खर्च करणाऱ्या, उच्च कौशल्य असलेल्या मनुष्यबळाचा वापर करणाऱ्या, वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने किंवा सेवा देणाऱ्या तसेच मजबूत प्रतिमा असलेल्या उद्योगांमध्ये गुंतवणूक केली जाते. पारंपरिक आर्थिक चक्रांपेक्षा नाविन्यतेच्या चक्रावर आधारित आणि वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांतील संधी शोधण्यावर भर दिला जातो. याबाबत प्रतिक्रिया देताना योजनेचे व्यवस्थापक Pratik Poddar यांनी सांगितले की, “दीर्घकालीन स्पर्धात्मकता मिळवण्यासाठी नाविन्यता हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरत आहे. जे उद्योग सातत्याने नवे प्रयोग करतात, ते अल्पकालीन आर्थिक बदलांचा परिणाम कमी करत उत्पादनक्षमता वाढवू शकतात, बाजारातील हिस्सा वाढवू शकतात आणि नवीन बाजारपेठाही निर्माण करू शकतात.”

भारतामध्ये अभियंते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि उद्योजक यांच्या माध्यमातून नवीन उत्पादने व सेवा विकसित होत असून, याच क्षेत्रांमध्ये भविष्यातील आर्थिक नेतृत्व घडत आहे. अशा उद्योगांमध्ये त्यांच्या प्रारंभीच्या टप्प्यात गुंतवणूक करणे ही गुंतवणूकदारांसाठी मोठी संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले. ही योजना अशा गुंतवणूकदारांसाठी उपयुक्त मानली जाते, जे दीर्घकालीन गुंतवणुकीस तयार असून अधिक जोखीम स्वीकारण्याची क्षमता ठेवतात. तसेच, विविधता राखण्यासाठी इतर मोठ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या योजनांना ही योजना पूरक ठरू शकते. तिसऱ्या वर्षात पदार्पण करताना, नाविन्यतेच्या आधारे शाश्वत मूल्य निर्माण करणाऱ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक सुरू ठेवणे आणि देशाच्या आर्थिक बदलांशी सुसंगत राहणे हेच या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये 38 वर्षीय रुग्णाला नवजीवन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

Medicover Hospitals, Bhosari येथे 38 वर्षीय रुग्णाचा जीव वाचवण्यात डॉक्टरांना उल्लेखनीय यश मिळाले आहे. तीव्र हृदयविकाराचा झटका (मॅसिव्ह हार्ट अटॅक) आणि कार्डियाक अरेस्टसारख्या जीवघेण्या स्थितीत असलेल्या या रुग्णावर आपत्कालीन अँजिओप्लास्टी आणि अत्याधुनिक अतिदक्षता उपचारांद्वारे यशस्वी उपचार करण्यात आले. सुरुवातीला रुग्णावर दुसऱ्या रुग्णालयात उपचार सुरू होते, जिथे कार्डियाक अरेस्टमुळे त्याला सीपीआर आणि डिफिब्रिलेशन देण्यात आले. मात्र, प्रकृती अधिक खालावत जाऊन कार्डिओजेनिक शॉक निर्माण झाल्याने त्याला तातडीने कार्डियाक ॲम्ब्युलन्सद्वारे मेडिकव्हर हॉस्पिटल्स, भोसरी येथे हलवण्यात आले. रुग्णालयात दाखल होताना रुग्णाची अवस्था अत्यंत गंभीर होती. त्याचा रक्तदाब आणि नाडी मोजता येत नव्हती. तात्काळ व्हेंटिलेटर आणि इनोट्रोपिक सपोर्ट देत उपचार सुरू करण्यात आले. आपत्कालीन कोरोनरी अँजिओग्राफीमध्ये हृदयाच्या Left Anterior Descending (LAD) धमनित मोठा रक्ताचा थक्का आढळून आला.




# आळंदी येथे “विश्वमंगल मराठी फाउंडेशन”चा दिमाखदार शुभारंभ

- आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या नेतृत्वाखाली भव्य शुभारंभ सोहळा संपन्न,
- मराठी शाळा आणि मराठी उद्योगांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी “विश्वमंगल मराठी फाउंडेशनची स्थापना



**पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

आळंदी येथील फ्रुटवाले धर्मशाळा सभागृहात दिनांक १ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात “विश्वमंगल मराठी फाउंडेशन” चा भव्य शुभारंभ सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध भागांतून तसेच देश-विदेशातून अनेक उद्योजक व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शुभारंभ सोहळ्यास माननीय आमदार श्री. सुभाष बापू देशमुख (सोलापूर), प्रख्यात वक्ते व ज्येष्ठ निरुपणकार श्री. विवेकजी घळसासी, तसेच राज्यभरातील अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून जागतिक स्तरावरील नामांकित उद्योजक श्री. संजय वायाळ (ईशवेद बायोटेक प्रा. लि.), डॉ. उदय भोसले (वैज्ञानिक, लंडन) आणि श्री. आप्पासाहेब कोंढारे (सुवर्ण व्यावसायिक, दुबई) हे विशेषतः परदेशातून उपस्थित राहिले होते. कार्यक्रमाची सुरुवात आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे महापूजन करून करण्यात आली. मंदिर समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर वारकऱ्यांच्या उपस्थितीत माऊलींच्या मंदिरापासून सभागृहापर्यंत दिंडी काढण्यात आली.

यानंतर सभागृहात मुख्य कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले तसेच “विश्वमंगल मराठी फाउंडेशन”च्या लोगो व वेबसाईटचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यामुळे कार्यक्रमात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

प्रास्ताविक भाषणात माननीय आमदार श्री. सुभाष बापू देशमुख यांनी फाउंडेशनची स्थापना करण्यामागील प्रेरणा स्पष्ट केली. मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी शाळा आणि मराठी उद्योगांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी “विश्वमंगल मराठी फाउंडेशन” कार्यरत राहील, असे त्यांनी सांगितले. तसेच “लोकल टू ग्लोबल” आणि “ग्लोबल टू लोकल” ही संकल्पना विशद करत उपस्थितांना फाउंडेशनच्या कार्यात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी आशीर्वादपर शुभ संदेश देताना श्री. विवेकजी घळसासी यांनी माननीय आमदार सुभाष बापू देशमुख यांचा उल्लेख ध्येयवेढा नेतृत्व असा करत लोकमंगल ते विश्वमंगल या गेल्या २८ वर्षांच्या प्रेरणादायी प्रवासाचा गौरव केला. मराठी भाषा, संस्कार, कुटुंबव्यवस्था आणि एकमेकांना मदतीचा हात देण्याची परंपरा जपत महाराष्ट्राला यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यानंतर परदेशातून आलेल्या मान्यवर उद्योजकांसह उद्योजक परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात महाराष्ट्रातील नवउद्योजकांना जागतिक पातळीवर उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबत चर्चा करण्यात आली तसेच उद्योगवाढीच्या मार्गांवर मार्गदर्शन करण्यात आले.

“विश्वमंगल मराठी फाउंडेशन”चा सामाजिक संदेश घेऊन पंढरपूर ते आळंदी अशी सायकलवारी करणाऱ्या सायकल्स क्लब, पंढरपूरच्या सायकलवीरांचा स्वागत-सन्मान या सोहळ्यात करण्यात आला. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमात युवा भारूडकार कृष्णाई उळेकर यांनी सादर केलेला “बुरगुंड” हा समाजप्रबोधनात्मक भारूड कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला. या भारुडामधून फाउंडेशनची कार्यपद्धती तसेच सामाजिक उपक्रमांची प्रभावी मांडणी करण्यात आली. याशिवाय फाउंडेशनच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्रातील विविध गावांतील जिल्हा परिषद शाळा दत्तक घेणाऱ्या उद्योजकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच आळंदी येथे “विश्वमंगल मराठी फाउंडेशन”ची पहिली स्थानिक समिती स्थापन करण्यात आली असून समितीतील सदस्यांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचा समारोप भक्तिभावपूर्ण वातावरणात पसायदान गाऊन करण्यात आला. “विश्वमंगल मराठी फाउंडेशन”च्या माध्यमातून मराठी भाषा, संस्कृती आणि सामाजिक विकासासाठी व्यापक स्तरावर कार्य होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे




### कलाकारांसाठी कार्य कौतुकास्पद; जागा देण्याची तयारी – रविंद्र चव्हाण

मुंबई (आरंभ पर्व) : चित्रपट क्षेत्रातील जेष्ठ कलाकारांच्या समस्या सोडवण्यासाठी कार्यरत असलेल्या कलाकार कल्याण संस्थेचे काम अत्यंत कौतुकास्पद असल्याचे मत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केले. जेष्ठ कलाकारांसाठी कोकणातील सावंतवाडी परिसरात स्वतःची एक एकर जागा देण्याची तयारी त्यांनी दर्शवली. जेष्ठ कलाकारांच्या सन्मानार्थ आयोजित समारंभात मान्यवर कलाकारांच्या छायाचित्रांसह माहितीफलकाचे उद्‌घाटन चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकारांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना चव्हाण म्हणाले की, कलाकारांचा एक ठराविक प्रसिद्धीचा काळ असतो; मात्र तो ओसरल्यानंतर अनेकांकडे दुर्लक्ष होते. अशा वेळी त्यांना दैनंदिन जीवनात विविध अडचणींचा सामना करावा लागतो. हजारो कलाकार आणि या क्षेत्रातील कामगारांना सामाजिक आयुष्यात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याची माहिती त्यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या समस्या सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला जेष्ठ कलाकार, पदाधिकारी आणि चित्रपट व दूरचित्रवाणी क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

### डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

पुणे (आरंभ पर्व) : डॉक्टरांवरील वाढत्या हल्ल्यांच्या आणि खोट्या फौजदारी तक्रारींच्या पार्श्वभूमीवर रुग्ण हक्क परिषदेने 'डॉक्टर सुरक्षा अभियान' सुरू केले आहे. या अभियानातून राज्यभरात डॉक्टरांना सुरक्षित व न्याय्य वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी डॉक्टर, हॉस्पिटल, पोलीस, कायदेतज्ज्ञ व समाज यांच्या सामूहिक प्रयत्नांची गरज आहे, असा सूर या अभियानाच्या बैठकीत उमटला. नवी पेठेतील पत्रकार भवनात आयोजित बैठकीमध्ये डॉक्टर, कायदे तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत यावर सविस्तर चर्चा झाली. रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक उमेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत माजी सहायक पोलीस उपायुक्त भानुप्रताप बर्गे व जान महमंद पठाण, आयएमए महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे, होप हॉस्पिटलचे डॉ. अमोल देवळेकर, वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. मंदार सावजी, डॉ. उमेश टेकवडे, डॉ. प्रीती काळे, डॉ. मुकुंद संगमनेरकर, डॉ. समीर बदामी, डॉ. सागर रोकडे, डॉ. संतोष तळेकर, डॉ. कुणाल कामठे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कदम, रुग्ण हक्क परिषदेच्या पुणे शहराध्यक्षा अपर्णा साठ्ये-मारणे, अजय विरकर आदी उपस्थित होते.







# गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड गौरव

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मिसिंग लिंक' प्रकल्पासाठी नवयुगाचे कौतुक केले

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

Navayuga Engineering Company Limited (NECL) ने मुंबई-पुणे एक्सप्रेसवे 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा भाग म्हणून जगातील सर्वात रुंद भूमिगत बोगदा तयार करून कारकिर्दीतला दुसरा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड पटकावला आहे. हा अभूतपूर्व पराक्रम भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून अभियांत्रिकी कौशल्य आणि आपल्या क्षमता ओलांडण्याच्या धाडसी दृष्टिकोनाचे प्रतीक आहे.

अनेक वर्षांपासून सह्याद्री पर्वतरांगांमधून होणारा मुंबई-पुणे प्रवास निसर्गरम्य असला तरी वेळखाऊ आणि अनिश्चित होता. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून महाराष्ट्र शासनाने १३.३ किमी 'मिसिंग लिंक' जोडण्याची संकल्पना मांडली. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDCL) यांनी साकारला आणि नवयुगा इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेडने प्रत्यक्षात आणला.




महाराष्ट्र दिनी उद्‌घाटन झालेला हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक ठरला आहे. खंडाळा घाटातील वाहतूक टाळून हा मार्ग प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी करतो आणि महाराष्ट्रातील महत्त्वाच्या वाहतूक मार्गावरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी करतो.

या ऐतिहासिक क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा पवार आणि नवयुगा इंजिनिअरिंगचे व्यवस्थापकीय संचालक श्री चिंत श्रीधर उपस्थित होते.

नावयुगा इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री चिंत श्रीधर म्हणाले, "हा केवळ जागतिक विक्रम नाही, तर भारत काय साध्य करू शकतो याचे द्योतक आहे. सह्याद्रीतील कठीण बेसॉल्ट खडकांमध्ये सर्वात रुंद भूमिगत बोगदा उभारणे ही आमच्या जागतिक दर्जाच्या पायाभूत प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याच्या क्षमतेची साक्ष आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डकडून मिळालेली ही पावती आणि मान्यता आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे." NECL चे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि प्रादेशिक प्रमुख श्री रमेश सिंगूरू म्हणाले, "या प्रकल्पासाठी लाखो मनुष्यांची मेहनत, वेळ आणि चिकाटी लागली. या भव्य उपक्रमासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळवताना नवयुगाचे प्रतिनिधित्व करताना मला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो."

ते पुढे म्हणाले, "जमिनीच्या मर्यादा आणि डोंगराळ-खोलीच्या भूप्रदेशातील तीव्र उतारांमुळे प्रकल्पात मोठी आव्हाने होती. यावर सूक्ष्म नियोजन आणि प्रगत अभियांत्रिकी उपायांनी मात करण्यात आली. यात ३०० मीटर अंतरावर क्रॉस पॅसेजेस, NATM पद्धतीने नियंत्रित स्फोट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला."

मोठ्या जलसाठ्याखाली बांधकाम करताना अत्याधुनिक SCADA प्रणाली, उच्च-दाब पाण्याच्या फवाऱ्याद्वारे अग्निशमन, ITMS, सार्वजनिक घोषणा प्रणाली, SOS यंत्रणा आणि प्रगत वायुवीजन प्रणाली यांचा वापर करून उच्च सुरक्षामानके राखली गेली. तसेच सुमारे १८० मीटर खोल दरीत UHPFRC गर्डर्स वापरून व्हायाडक्ट बांधण्यात आले.

हा १३.३ किमी लांबीचा प्रकल्प असून त्यातील १०.६७ किमी भाग ५-लेन दुहेरी बोगद्यांचा आहे, ज्याची रुंदी प्रत्येकी २२.३३ मीटर आहे.

## जागतिक हास्यदिनानिमित्त कपिल शर्माचा विशेष भाग; समय रैना व रणवीर अल्लाहबादिया रंगत वाढवणार




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

काही क्षण ट्रेंड होतात आणि काही "मस्ट वॉच" बनतात, आणि हा एपिसोड त्यापैकीच एक आहे जो पूर्णपणे हसण्याने भरलेला आहे. वर्ल्ड लाफ्टर डे निमित्त नेटफ्लिक्स कॉमेडीला खास बनवत द ग्रेट इंडियन कपिल शो (TGIKS) चा एक स्पेशल एपिसोड घेऊन येत आहे. या एपिसोडमध्ये कॉमेडीचे बादशाह कपिल शर्मा यांच्यासोबत नव्या पिढीतील कलाकार समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया देखील दिसणार आहेत. हा एक मजेदार क्रॉसओव्हर आहे, ज्यामध्ये जोक्स आणि सतत हसवणारे क्षण पाहायला मिळणार आहे. याबाबत कपिल शर्मा म्हणाला, "आमच्या शो ला प्रेक्षकांकडून मिळणारे प्रेम हे आम्हाला नेहमी काहीतरी नवीन आणि मजेदार कंटेंट बनवण्यासाठी प्रेरणा देते. वर्ल्ड लाफ्टर डे निमित्त आम्ही नेटफ्लिक्ससोबत मिळून एक खास एपिसोड तयार केला आहे, जो खूप मजेदार आणि भरपूर हसवणारा आहे. या एपिसोडमध्ये समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया देखील त्यांच्या खास स्टाईलमध्ये सहभागी होत आहेत, ज्यामुळे शो आणखी खास होणार आहे. आमचा उद्देश फक्त एवढाच आहे की लोकांनी आमच्यासोबत हसत-हसत आनंदाने हा दिवस साजरा करावा." जसजशी चर्चा अधिक रंजक होत जाते, तसा स्टेज अचानक टीजीआयकेएस न्यूज डिबेटमध्ये बदलतो. ज्यात सुनील ग्रोवर मुख्य भूमिकेत दिसतो. त्यानंतर नेहमीप्रमाणे टीजीआयकेएसच्या खास स्टाईलमध्ये कृष्णा अभिषेक 'मोना' आणि किकू शारदा 'सोना'च्या भूमिकेत एंट्री करतात.

## हाजिरा येथे प्रगत पोलाद निर्मिती रेषेचे उद्‌घाटन

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाने (एएम/एनएस इंडिया) आज गुजरातच्या हाजिरा येथील कंपनीच्या प्रमुख प्रकल्पात,भारतातील जपानचे राजदूत सन्माननीय (or राजमान्य राजश्री) श्री. केइची ओनो यांच्या हस्ते प्रगत पिक्लिंग लाइन आणि टँडम कोल्ड मिल (PLTCM) चे उद्‌घाटन करण्याची घोषणा केली. प्रति वर्ष 2 दशलक्ष (or 20 लाख) टन्सची क्षमता असलेल्या प्रगत-अद्ययावत PLTCM चे उद्‌घाटन AM/NS इंडियाच्या ऑटोमेटिव उत्पादन क्षमतेमध्ये महत्वाची भर म्हणून करण्यात आले आहे आणि लवकरच उच्च-प्रतीच्या, कोल्ड-रोल्ड बेस स्टीलच्या उत्पादनासाठी ही सुसज्ज होईल, ज्याचा उपयोग तत्सम प्रकारच्या पहिल्या, तसेच जनक (or मूळ) कंपन्या आर्सेलॉर मित्तल आणि निप्पॉन स्टील द्वारा पेटंटप्राप्त स्टील सोल्यूशन्ससह



जागतिक-दर्जाच्या उत्पादनांच्या निर्मितीसाठी केला जाईल. ही नवीन लाइन ऑटोमोटिव्ह उद्योगाच्या वाढत्या गरजांच्या पूर्ततेसाठी ॲडव्हान्स्ड हाय स्ट्रेंथ स्टील (AHSS) च्या उत्पादनात भारताला पूर्णपणे आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने उचललेले एक महत्वाचे पाऊल आहे. भारतातील अत्यंत प्रगत प्रॉडक्शन लाइन्समध्ये, ह्या सुविधेत (or फॅसिलिटीत) जनक (or मूळ) कंपन्यांच्या सखोल नैपुण्यावर आधारित तांत्रिक प्रगत-अद्ययावत प्रक्रिया तंत्रज्ञान, उत्कृष्ट स्वयंचलन (or ऑटोमेशन) आणि जागतिक मापदंड प्रमाणित गुणवत्ता प्रणाली ह्यांचे संकलन आहे.

## बुद्ध पौर्णिमेनिमित्त 'धम्म पहाट'ला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे' यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'धम्म पहाट' कार्यक्रमाला पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शांतता, समता आणि बंधुभावाचा संदेश देणाऱ्या या सांस्कृतिक कार्यक्रमातून बुद्धविचारांचा जागर पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला. यंदा या कार्यक्रमाचे २० वे वर्ष असून, या विशेष प्रसंगी पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे, उपमहापौर तथा कार्यक्रमाचे आयोजक परशुराम वाडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, बार्टीच्या सुचिता शिंदे, माजी नगरसेविका लता राजगुरू, नगरसेवक निलेश आल्हाट, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, रमाई स्मारकाचे प्रमुख विठ्ठल गायकवाड, बबन जोगदंड, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर,



समितीचे सचिव दीपक म्हस्के, मिलिंद अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात चेतन चोपडे यांच्या नेतृत्वाखालील कलापथकाने 'भीमा तुझ्या पाऊल खुणा' या भीमगीतांच्या सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विकास साळवे, स्नेहल प्रधान यांच्यासह अन्य कलाकारांनी प्रभावी साथ दिली. 'प्रथम नमो गौतमा', 'तुज प्रथम हे नमन गौतमा', 'अनुसरा शिकवण बुद्धाची', 'नमो बुद्धाय म्हणे', 'प्रबुद्ध हो मानावा', 'पिंपळाच्या पानावर पाहिले चित्र गौतमाचे', 'करू भीमाचे चिंतन इथे', 'बुद्ध-फुले-आंबेडकर सांगू आम्ही', 'भीम भगवान माझ्या झोपडीत शान आहे' यांसारख्या गीतांनी वातावरण भारावून गेले.

तसेच, राजर्षी शाहू महाराजांवरील 'माझा लोकराजा शाहू' या रॅपसह विविध गीतांनी कार्यक्रमाला वेगळी उंची दिली. उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या विनंतीवरून सादर करण्यात आलेले शाहीर वामनदादा कर्डक यांचे 'पाणी वाढ गं माय', 'लई नाय मागत', 'भर माझं इवलंसं गाडगं' या गीतांनी उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला. यावेळी बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले की, गेली वीस वर्षे 'धम्म पहाट' या कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. महापौर मंजूषा नागपुरे यांच्या सहकार्याने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नवीन पुतळा, रमाईंचा पुतळा आणि संविधान उद्यान यांसारखे प्रेरणादायी प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्याच्या जागतिक परिस्थितीत अनेक ठिकाणी युद्धजन्य वातावरण असताना भारतात बुद्धविचारांवर आधारित संविधानामुळे शांतता टिकून आहे. जगाला शांततेचा मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य बुद्ध विचारांमध्ये असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली, तर समारोप धम्म पालन गाथेने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक म्हस्के आणि महेश अचिंतवार यांनी केले.

## जागरूकता आणि कृती यांमधील दरी सांधणे

### उत्पादन साक्षरतेचे 'मालकीभाव' मध्ये रूपांतर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आपण अशा युगात जगत आहोत जिथे सर्वसामान्य भारतीय व्यावसायिक हा आर्थिक संज्ञांचा चालता-फिरता ज्ञानकोश आहे. तरीही आपली निवृत्तीची तयारी कमीच आहे ही आश्चर्याची बाब आहे. आपण एक असा देश आहोत जो एक सिद्धांत म्हणून निवृत्ती नियोजनाची गरज ओळखतो, पण व्यवहारात त्याला एक 'तातडीची नसलेली चैनीची गोष्ट' मानतो. हीच आहे 'जागरूकता-कृती यांच्यातील दरी' आणि ती भरून काढणे हे आता केवळ एक आर्थिक ध्येय राहिलेले नाही, तर ते वैयक्तिक आत्मसन्मानासाठी एक गरज बनले आहे. इंडिया रिटायरमेंट इंडेक्स स्टडी (आयरिस) ५.० च्या आकडेवारीतून एक सातत्यपूर्ण अवलंबित्व पूर्वग्रह दिसून येतो. त्यात भारतीयांचा एक



मोठा वर्ग अजूनही आपल्या मुलांनाच आपले अंतिम सुरक्षा कवच मानतो.

अनुराग गुप्ता, संचालक आणि मुख्य व्यवसाय अधिकारी, पार्टनरशिप चॅनेल, ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लि. म्हणाले की, भारतातील आरोग्यसेवेचा खर्च सर्वसाधारण महागाईच्या दरापेक्षा जवळपास दुप्पट वेगाने वाढत असल्याने तुमच्या कुटुंबावर आर्थिक भार बनण्यापासून वाचण्यासाठी तुमची आर्थिक मालकी हीच तुमची एकमेव ढाल आहे. टियर २ आणि ३ भौगोलिक प्रदेशांमध्ये संयुक्त कुटुंब पद्धतींपासून दूर जाण्याच्या बदलामुळे "आत्मनिर्भरता" हा आता पर्याय राहिलेला नाही, तर ती एक भौगोलिक-निरपेक्ष गरज बनली आहे. वयाच्या सत्तरीत वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ रोख रकमेची गरज असते वडिलोपार्जित जमिनीच्या तुकड्याची नव्हे. हाच तरलतेचा सापळा आहे. आयरिस ५.० हे अधोरेखित करते की, भारतीयांची निवृत्तीसाठीची बहुतांश बचत अशा साधनांमध्ये अडकलेली आहे, जी नियमित आणि अंदाजित रोख प्रवाह देत नाहीत. दर महिन्याला 'घरातील चूल पेटती ठेवणे' हे उद्दिष्ट असते. यासाठी वार्षिकी आणि निवृत्तीवेतन उत्पादनांकडे वळणे आवश्यक आहे, जे उत्पन्नाचा एक स्थिर, खात्रीशीर प्रवाह देतात आणि तुमची संपत्ती तुम्हाला नेमकी गरज असेल तेव्हा उपलब्ध होईल याची खात्री देतात.

आयरिस ५.० मधील कदाचित सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नियोजन आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील सहसंबंध. लवकर नियोजन करणारे लोकांच्या मनात चिंता कमी असते आणि जीवनातील समाधान खूप असते. सेवानिवृत्तीची मालकी म्हणजे फक्त बँकेतील शिल्लक नाही तर मानसिक शांती मिळवणे आहे.

## 'निसर्गासोबत भूदृश्यकला' पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम जाहीर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनमधील (बीएनसीए) भूदृश्यकला विभागातर्फे सर्व उपलब्ध विद्याशाखांमधील पदवीधरांसाठी 'निसर्गासोबत भूदृश्यकला' (लॅण्डस्केप विथ नेचर) या विषयावरील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येत आहे. जागतिक भूदृश्यकला महिन्यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांनी या अभ्यासक्रमाची अधिकृत घोषणा केली. यावेळी प्रसिद्ध भूदृश्यकला वास्तूरचनाकार (लॅण्डस्केप आर्किटेक्ट) विकास भोसेकर, त्यांच्या पत्नी नीलिमा भोसेकर तसेच अमेय भोसेकर, मोहिनी भोसेकर, बीएनसीएतील भूदृश्यकला विभागप्रमूख डॉ. स्वाती सहस्रबुद्धे, प्रा. मुक्ता गोखले कुलकर्णी. प्रा. क्षितिजा कोल्हटकर, प्रा. स्नेहल मिजार आणि प्रा. अमृता बर्वे उपस्थित होते. यावेळी विकास भोसेकर यांनी त्यांच्या भूदृश्यकला या विषयावरील काही प्रकल्पाचे सादरीकरण केले. तसेच त्यांची मुलाखत डॉ. स्वाती सहस्रबुद्धे यांनी घेतली. निसर्गासोबत भूदृश्यकला या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची अधिकृत घोषणा करताना डॉ. कश्यप म्हणाले की, डॉ. स्वाती सहस्रबुद्धे यांच्या संकल्पकतेतून साकारलेला हा अभ्यासक्रम ही काळाजी गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार हा अभ्यासक्रम कला, वाणिज्य आणि शास्त्र शाखातील कोणत्याही पदवीधरासाठी उपयोगी असून भूदृश्यकला विषयातील तो एक मैलाचा दगड ठरतो आहे.

## संतूर स्नानद्रवाची 'चंदनाचा नवसंगम' मोहीम सुरू; अभिनेत्री श्रीलीला नवी ब्रँड दूत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विप्रो कंझ्युमर केअर अँड लायटिंगच्या संतूर पोर्टफोलिओचा भाग असलेल्या संतूर शॉवर जेलने, अभिनेत्री श्रीलीला हिला नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केले आहे. यासोबतच कंपनीने 'सँडलवूड का रिमिक्स' ही नवीन टीव्ही जाहिरात मोहीम सुरू केली आहे. संतूर शॉवर जेलने आपल्या पारंपरिक चंदन घटकाला नवीन लिक्विड बॉडी वॉशच्या स्वरूपात सादर केले आहे. हे उत्पादन रोजच्या वापरासाठी योग्य आहे. यात चंदन आणि गार्डेनिया फुलांचे अर्क मिसळले आहेत, जे त्वचेला मऊ ठेवण्यास आणि नैसर्गिक चमक वाढवण्यास मदत करते. हे शॉवर जेल सौम्य आणि pH संतुलित असल्याने ते दररोज सुरक्षितपणे वापरता येते. या संकल्पनेला अधिक आकर्षक बनवण्यासाठी ब्रँडने 'सँडलवूड का रिमिक्स' ही मोहीम सुरू केली आहे, या मोहिमेत पारंपरिक चंदनाला नव्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे. या मोहिमेचा भाग म्हणून अभिनेत्री श्रीलीला हिला ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवडण्यात आले आहे, जी परंपरा आणि आधुनिकतेचा



सुंदर संगम उत्तम प्रकारे दाखवते. या मोहिमेबाबत विप्रो कंझ्युमर केअर अँड लायटिंगच्या सीनिअर व्हाइस प्रेसिडेंट – मार्केटिंग, एस. प्रसन्ना राय म्हणाले, "चंदन हा नेहमीच संतूर ब्रँडचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. संतूर शॉवर जेलच्या माध्यमातून, आम्ही या पारंपरिक घटकाला आजच्या ग्राहकांसाठी उपयुक्त अशा नव्या स्वरूपात सादर करत आहोत. या टप्प्यावर परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम दर्शवणाऱ्या व्यक्तीसोबत भागीदारी करणे महत्त्वाचे होते. त्यामुळे आम्ही अभिनेत्री श्रीलीला हिची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड केली आहे. तिच्या उत्साही आणि आधुनिक व्यक्तिमत्त्वामुळे ती ब्रँडशी आणि ग्राहकांशी सहज जोडली जाते." या सहकार्याबद्दल बोलताना अभिनेत्री श्रीलीला म्हणाली, "माझ्यासाठी चंदन नेहमीच सौंदर्य आणि त्वचेच्या काळजीचे प्रतीक राहिले आहे. संतूर सँडलवुड ब्युटी वॉशने या पारंपरिक घटकाला आधुनिक रूप दिले आहे, ते मला खूप आवडले. 'सँडलवूड का रिमिक्स' ही कल्पना माझ्या पिढीशी जोडलेली वाटते, कारण ती परंपरा आणि नवीन विचारांचा सुंदर संगम दाखवते. संतूर शॉवर जेलची ब्रँड ॲम्बेसेडर बनून या प्रवासाचा भाग होण्याचा मला आनंद आहे." ही मोहीम बेट्स बंगळूर संकल्पित केली आहे. जुनी गाणी जशी नव्या रूपात सादर केली जातात, तसेच या मोहिमेत चंदन या पारंपरिक घटकाला आधुनिक बॉडी वॉशच्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे. ही मोहीम टेलिव्हिजन आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रसारित केली जाणार आहे. संतूर शॉवर जेल श्रेणीमध्ये केशर आणि झेंडू तसेच लिंबू आणि चाफा असे विविध प्रकार उपलब्ध आहेत. संतूर शॉवर जेल 250 मिली पॅकची किंमत 135 रुपये असून ती सर्व रिटेल दुकानांमध्ये आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.